# दिनांक 02/04/2025

1 कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 30/03/2025 रोजी 20:30 वा च्या सुमारास रा.मौज.भालीवडी ता.कर्जत येथे महिला फिर्यादी यांचे मालकीचे जागेत आरोपी क्र 1 ते 3 हे काहीएक न विचारता सर्वजन खडडा खोदून घर बाधण्यासाठी विट काम करीत होते. तेव्हा फिर्यादी व साक्षीदार व मुलगा असे तेथे जावुन आरोपी क्र.1 ते 3 रा. भालीवडी , ता.कर्जत यांना म्हणाले की, आमचे जागेत घराचे बांधकाम करू नका तेव्हा आरोपी क्र.01 ते 03 हे फिर्यादी व साक्षीदार क्र.01 व 02 यांना म्हणाले की, आम्ही आमचे जागेत बांधकाम करीत आहोत असे बोलून आरोपी क्र.01 याने फिर्यादी यांचा डावा खांदा पकडून फिर्यादी यांचे ब्लाउजमध्ये हात घालून त्यांचे स्त्री मनास लज्जा उत्पन्न करून हाताबुक्क्याने मारहाण केली तसेच आरोपी क्र.01 ते 03 यांनी संगनमत करून साक्षीदार क्र.01 व 02 यांना तुम्हाला खुप माज आली आहे काय, आमचे वाटयाला गेला तर तुम्हाला सोडणार नाही अशी धमकी देवून फिर्यादी व साक्षीदार क्र.01 व 02 यांना हाताबुक्यांनी मारहाण करून शिवीगाळी केली आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.75/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 74, 115(2),352,351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसई श्रीम.लटपटे ह्या करीत आहेत.

2. म्हसळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 29/04/2015 रोजी 10:00 वा ते दि. 29/06/2018 रोजी 10:00 वा च्या दरम्यान मौजे ग्रामपंचायत कार्यालय पांगळोली येथील कार्यालयात ता.म्हसळा येथे 02 आरोपीत रा.म्हसळा यांनी संगनमत करून कोणतेही देयके व बिल सादर न करता अनियमितता करून मौजे ग्रामपंचायत पांगळोली येथील कार्यालयात वरील कालावधीत शासनाच्या निधीचा व त्यांचे पदाचा गैरवापर करून चूकीच्या पध्दतीने खर्च करून शासकीय निधीचा अपहार केला आहे.

याबाबत म्हसळा पोलीस ठाणे गुरनं.21/2025 भा.दं.वि.क.409,34 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री.संदीप पाटील हे करीत आहेत.

3. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 31/03/2025 रोजी 19:45 वा च्या सुमारास मौजे रा.कर्जत बोध्दनगर कचेरीरोड,नगरपालीकेच्या केलीकेच्या समोर ता.कर्जत येथे फिर्यादी यांच्या मालकीची एकूण 50,000/-रुपुये किंमतीची रिक्षा क्र.एम.एच-46 बीडी-5747 ही कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे संमती शिवाय लबाडीचे हेतुने चोरुन नेली आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.96/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम

303(2)अन्वये प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/स्वप्नील येरुणकर करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 01.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 217 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 1,99,400/-रुपये इतका दंड आकारला आहे.